# माहितीचा अधिकार अधिनियम, 2005

## खंड (ब) (4)

## मॅन्युअल 4

**संस्थेची कर्तव्ये पार पाडण्याकरिता विहित केलेली प्रमाणपध्दती**

केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांचा भाग म्हणून दि. 01.07.2017 पासून वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी सुरु झाली. त्यामुळे जकात कर रद्द होऊन जकात कर वसुली बंद करण्यात आली. त्यामुळे जकात नाके व कार्यकेंद्रे येथील दैंनदिन कामकाज बंद झाले आहे.

जकात नाके व कार्यकेंद्रे येथे प्रलंबित असलेल्या एन प्रपत्र मागणीपत्रे, आर प्रपत्र मागणीपत्रे, लेखापरीक्षण टिप्पण्या, अभिलेख वर्गीकरण व विल्हेवाट,जकात परतावा दावे इत्यादी कामाच्या निपटा-याकरिता जकात मुख्य कार्यालय,कांजूरमार्ग येथे उप करनिर्धारक व संकलक, सहाय्यक करनिर्धारक व संकलक,अधिक्षक, पर्यवेक्षी निरीक्षक, जकात निरीक्षक व आंतरवृंद कर्मचारी जसे प्रशासकीय अधिकारी, मुख्य लिपिक, लिपिक इ. नियुक्त करण्यात आले आहेत.

**एन प्रपत्र मागणीपत्रे**

दि.01.07.2017 पूर्वी मुंबई महानगरपालिका अधिनियम,1888 कलम 194 (अ) अन्वये एन प्रपत्र अंतर्गत जकात माफी देण्यात येत होती. सदर माल 168/72 तासांच्या आत म.न.पा कर्मचा-यांच्या देखरेखीखाली निर्यातीचा दाखला घेऊन मुंबई बाहेर निर्यात होणे आवश्यक होते. अशाप्रकारे निर्यातीचा दाखला न घेता मुंबईबाहेर निर्यात झालेल्या एन प्रपत्राबाबतच्या मागणीपत्राचा निपटारा जकात नियमावली क्र. 11 (c) पक्षकाराने सादर केलेल्या कागदपत्रांच्या पडताळणी अनुसार सक्षम अधिका-याच्या मंजुरीने सदर एन प्रपत्र मागणीपत्रातील जकात माफ करण्यात येते.

**आर प्रपत्र मागणीपत्रे**

दि.01.07.2017 पूर्वी बृहन्मुंबईच्या हद्दीत दुरुस्ती, निरीक्षण, प्रदर्शन, प्रात्यक्षिक,प्रक्रीया इ. करिता मुंबईत/ मुंबई बाहेर आयात/निर्यात करण्यात येणा-या मालावर जकात नियमावली 1965 अंतर्गत नियम क्र.07 व 08 भाग 2 अन्वये वर नमूद केलेल्या कारणाकरिता आयात करण्यात येणा-या वस्तूवरील जकातीच्या रक्कमेइतकी तात्पुरती अनामत रक्कम स्वीकारुन किंवा कायम अनामत रक्कम स्वीकारुन जकात कर माफी देण्यात येत होती. जर अशा वस्तू त्यांच्या स्वरुपात काही बदल न होता सहा महिन्यांच्या आत निर्यात करण्यात आल्या नाहीत तर आर प्रपत्र अंतर्गत जकातीच्या रक्कमेच्या वसुलीकरिता पक्षकारास मागणीपत्रे पाठविण्यात येत आहेत. अशा प्रकरणात तात्पुरती अनामत रक्कम स्वीकारुन आर प्रपत्र सवलत देण्यात आली असेल तर सदर अनामत रक्कम जप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**लेखापरिक्षण टिप्पण्या**

प्रलंबित लेखापरिक्षण टिप्पण्याबाबत पक्षकारास मागणीपत्रे पाठवून पाठपुरावा करण्यात येत आहे.

**अभिलेख वर्गीकरण व विल्हेवाट**

जकात विभागातील नाके, कार्यकेंद्रे, विविध उपविभाग येथे असलेल्या अभिलेखाचे अभिलेख वर्गीकरण पुस्तिका 2015 अनुसार वर्गीकरण करुन विल्हेवाट लावण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

**जकात परतावा**

1) अधिक वा चुकीची जकात वसुली झाल्यास 3 महिन्याच्या आंत जकात परताव्याचा दावा दाखल करणे आवश्यक.
2) कलम 195 अंतर्गत जकात नियमावली, 1965 मधील आवश्यक बाबींची पूर्तता केल्यास जकात भरुन आयात केलेला माल 6 महिन्यांच्या आंत निर्यात करणे आवश्यक. परतावा दावा निर्यात तारखेपासून 1 महिन्याच्या आत दाखल करणे आवश्यक. जकात नियमावली, 1965 मध्ये विहित केलेल्या डी. ई. प्रपत्रात, महापालिका अधिका-यांनी पारीत केलेल्या 'सी सी' 'सी', 'एफ' प्रपत्रासह दावा दाखल करणे आवश्यक.

3) दि.01.07.2017 पूर्वी बृहन्मुंबईच्या हद्दीत दुरुस्ती, निरीक्षण, प्रदर्शन, प्रात्यक्षिक,प्रक्रीया इ. करिता आयात/निर्यात करण्यात येणा-या मालावर जकात नियमावली 1965 अंतर्गत नियम क्र.07 व 08 भाग 2 अन्वये वर नमूद केलेल्या कारणाकरिता आयात करण्यात येणा-या वस्तूवरील जकातीच्या रक्कमेइतकी तात्पुरती अनामत रक्कम स्वीकारुन किंवा कायम अनामत रक्कम स्वीकारुन जकात कर माफी देण्यात येत होती. जर अशा वस्तू त्यांच्या स्वरुपात काही बदल न होता सहा महिन्यांच्या आत निर्यात करण्यात आल्या तर स्वीकारलेल्या तात्पुरत्या अनामत रक्कमेचा परतावा देय आहे. जकात कर रद्द झाल्यामुळे अर्ज व कागदपत्रे सादर केलेल्या पक्षकारांना कागदपत्रांच्या तपासणीअंती कायम अनामत रक्कमांचा परतावा देय आहे.